NAAC Accredited with Grade "B" 2004
NAAC RE-Accredited with Grade "B" 2014

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगांव द्वारा संचलित,

# कै. व्यंकटराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, बाभळगांव

## ता. जि. लातूर

### (कला, वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी.)

J-62-01-024

युडायस क्र. २७२८०११२१०८

मा. श्री धिरज देशमुख
अध्यक्ष
फोन : 02382-265154

मा. श्री शाम देशमुख
सचिव
मो. 9420450000

मा. डॉ. दुष्यंत कटारे
प्राचार्य
मो. 8308305050, फोन : 02382-265595
Email : latevdmb@gmail.com

जा.क्र. 2026-2027/12. दिनांक : 24/06/2026

प्रति,
प्रा.गायके हरिहर प्रभाकर,
संत ज्ञानेश्वर नगर,
एल.सी.कॉलनी, लातूर

विषय :— सेवापूर्ती समारंभास उपस्थित रहाणे बाबत.

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आपण आमच्या महाविद्यालयात नियत वयोमानाप्रमाणे दि.३१.०५.२०२६ रोजी सेवानिवृत्त झाला आहात. आम्ही आपला सेवापूर्ती गौरव समारंभ दि.२७.०६.२०२६ रोजी ठिक ५.३० वा. हॉटेल तुलशी प्युअर व्हेज, औसा रोड, लातूर येथे आयोजित केला आहे.

तरी आपण सहकुटूंब मित्र परिवारासहीत आमच्या विनंतीस मान देवून उपस्थित रहावे ही विनंती.

प्राचार्य
कै व्यंकटराव देशमुख महाविद्यालय
बाभळगांव ता.जि.लातूर

दि.२४.०६.२०२६

# सुचना

महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—याना कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील हॉर्टीकल्चर विषयाचे प्रा.गायके एच.पी नियत वयोमानाप्रमाणे दि.३१.०५.२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. आपल्या महाविद्यालया तर्फे त्यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ दि.२७.०६.२०२६ रोजी ठिक ५.३० वा. हॉटेल तुलशी प्यूअर व्हेज, औसा रोड, लातूर येथे आयोजित केला आहे.

तरी आपण सर्वानी या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

स्टाफ अकादमी

प्राचार्य
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय
बाभळगांव ता.जि.लातूर

1) Dr. D. P. Bhise —
2) प्रा. डॉ. के. पी. पोले — Kppole
3) डॉ. मा. ना. गायकवाड —
4) Dr. Sureshkumar Kamble —
5) प्रा. [illegible] —
6) " Badade A. B
7) " More C. S —
8) " Thadkar Ankush
9) Kamble R. R.
10) Mehetkar P. H
11) Maske V. D
12) Dope S. G.
13) Kadam V. P.
14) प्रा डॉ पवार जयदेवी
15) देशमुख बी. पी.
16) [illegible]
17) [illegible]
18) [illegible] — Thadkar

पाडकर ए. एस. —
Gond B. V. —
हालसीकर एस. एम.

27

**सूत्रसंचालन**

सू-स्वागतम सू-स्वागतम !!!

उपस्थित अभ्यंगताचे ,स्नेही ,प्राध्यापक ,शिक्षण ,व्यवसाय ,सामाजिक ,कृषि ,आरोग्य तथा प्रशासकीय क्षेत्रातील सर्व मान्यवरांचे हार्दिक स्वागत

**सेवापूर्ती गौरव समारंभ**

चारोळी

**सत्कारमूर्ती प्रा. हरिहर प्रभाकर गायके सर**

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**

**कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव चे प्राचार्य मा श्री डॉक्टर दुष्यंतजी कटारे सर**

**कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे**

चारोळी

**मा. खासदार श्री डॉ. शिवाजीराव काळगे साहेब (खासदार लातूर लोकसभा )**

**मा. श्री डॉ भारतजी बास्टेवाड सर (जिल्हाधिकारी लातूर )**

**मा. श्री शामरावजी देशमुख साहेब (मा.सचिव दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव)**

**मा श्री प्रवीणजी औताडे सर (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर )**

**प्रतिमापूजन** – सर्व मान्यवरांना मी विनंती करेन की आपण प्रतिमापूजन करून सेवापूर्ती गौरव समारंभास सुरुवात करूया .

**पाहुण्यांचे स्वागत सत्कार** स्वरूप – शाल व पुष्पहार

**कार्यक्रमाचे अध्यक्ष : महाविद्यालयाचे प्रा मा श्री डॉ दुष्यंत कटारे सर (प्राचार्य,कै.व्यं देशमुख महा बाभळगाव)**

स्वागतकर्ता – बाळासाहेब देशमुख सर कार्यालय अधीक्षक कै व्यंकटराव देशमुख महाविद्यालय यांनी करावे.

**प्रमुख अतिथी मा खासदार श्री डॉ शिवाजीराव काळगे साहेब (खासदार लातूर लोकसभा) –**

स्वागतकर्ता –माननीय सचिव शामरावजी देशमुख सर

**प्रमुख अतिथी मा श्री डॉ भारतजी बास्टेवाड सर (जिल्हाधिकारी लातूर जिल्हा) –**

स्वागतकर्ता – मा प्राचार्य डॉ. दुष्यंतजी कटारे सर

**प्रमुख** अतिथी मा श्री शामरावजी माणिकराव देशमुख (मा सचिव दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव )– स्वागतकर्ता –प्राध्यापक कदम सर स्टाफ सचिव

**प्रमुख अतिथी मा श्री प्रवीण जी औताडे (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी लातूर) –**

स्वागतकर्ता – प्रा. कांबळे सर ( HOD इलेक्ट्रिकल टेक MCVC)

**सत्कारमूर्ती प्रा. हरिहर प्रभाकर गायके सर सपत्नीक संस्थेच्या वतीने सत्कार**

स्वागतकर्ता –मा सचिव श्री शामरावजी माणिकराव देशमुख साहेब (मा सचिव दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव ) व गायके मॅडम स्वागत डॉ पवार मॅडम करतील

**कार्यक्रमाचे प्रास्ताविक** – **प्रा.डॉ. नरेंद्रजी देशमुख सर हे करतील.**

**सन्मान पत्राचे वाचन** – **प्रा डॉ नाना जाधव सर हे करतील**

**सत्कारमूर्तींचा सत्कार** – **सत्कारमूर्ती प्रा. हरिहर प्रभाकर गायके सर** सपत्नीक होईल स्वरूप भेटवस्तू पूर्ण आहेर कै व्यंकटराव देशमुख कनिष्ठ तथा वरिष्ठ महाविद्यालय बाभळगाव यांच्या वतीने होईल सत्कार करण्यासाठी मी आमंत्रित करतो महाविद्यालयाचे प्राचार्य सर, स्टाफ सचिव व डॉ.पवार मॅडम व सहकारी

**मनोगत** 1. **प्रा संदीपान चेवले सर** 2.
3. 4.
5. 6.

**प्रमुख पाहुण्यांचे मनोगत**

1. **प्रमुख** अतिथी – **मा श्री प्रवीणजी औताडे सर (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर )**
2. **प्रमुख** अतिथी – **मा. श्री डॉ भारतजी बास्टेवाड सर (जिल्हाधिकारी लातूर )**
3. **प्रमुख** अतिथी – **मा. खासदार श्री डॉ. शिवाजीराव काळगे साहेब (खासदार लातूर लोकसभा )**
4. **सत्कारमूर्ती प्रा. हरिहर प्रभाकर गायके सर** (लेखक , व्याख्याते , कृषी अभ्यासक)
5. **अध्यक्षीय समारोप – मा. प्राचार्य मा श्री डॉक्टर दुष्यंतजी कटारे सर कै. व्यं देशमुख महा बाभळगाव**

**आभार प्रदर्शन** – विठ्ठलजी मुळे सर



टाफअकादमीच्या वतीने आयोजित सेवापूर्ती कार्यक्रमात सत्कार मूर्ती
प्राध्यापक गायके एच .पी .सत्काराला उत्तर देताना.




फअकादमीच्या वतीने आयोजित सेवापूर्ती कार्यक्रमात सत्कार मूर्ती
ध्यापक गायके एच .पी .प्राचार्य डॉ कटारे सर व सर्व प्राध्यापक वृंद

देशोन्नती

# मसीव्हीसी विभागाचे प्रा. गायके यांचा सेवानिवृत्ती समारंभ

दे ती वृत्तसंकलन

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील एमसीव्हीसी विभागाचे ज्येष्ठ प्रा. हरिअर गायके यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेला स्नेहपूर्ण सत्कार व सेवानिवृत्ती समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दीर्घकाळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक व सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा गौरव करण्यात आला. सेवानिवृत्ती समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, डॉ. दिपक मुळे , जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन, धाराशिव, महेश



कुलकर्णी (डी.एस.डी., विधानसभा उपाध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी अध्यक्षांसह प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून प्रा. हरिअर गायके यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या समर्पित सेवाकार्याचा गौरव करत त्यांच्या कार्याचा आदर्श नव्या पिढीतील शिक्षकांनी घ्यावा, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. यावेळी प्रा. संदिपान चेवले चंद्रकांत पाटील आणि जीपी सूर्यवंशी यांनी आपली शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

यावेळी विविध प्रशासकीय विभागांतील वरिष्ठ अधिकारी, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सामाजिक, सहकारी व व्यावसायिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये रेणा सहकारी साखर कारखान्याचे संचालक चंद्रकांत पाटील, प्राचार्य अनिल कुरेवाड, सेवाकर उपआयुक्त, मुंबई राजेशाहेब माने, जिल्हा उपआयुक्त (पशुसंवर्धन) लातूर डॉ. राजकुमार पाटील, बँकऑफबडोदाडेअरी, पुणे येथील असिस्टंट डेप्युटी मॅनेजर डॉ. विलास सुनार, महाराष्ट्रव्होकेशनलटीचर्स ऑर्गनायझेशनचे राज्याध्यक्ष भालचंद्र येडवे, भगवान नागरी सहकारी बँकेचे चेअरमन सुभाष पांचपुते, एमएसईबी, लातूरचे इलेक्ट्रिकल इंजिनिअर प्रमोद बुधवळे, उपविभागीय अभियंता विक्रम कोळवे, तसेच सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन), कळंब डॉ. हणमंत गायके व सहकार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर डॉ. रविंद्र गायके यांच्यासह कृषी व पशुसंवर्धन विभागातील अधिकारी, एमसीव्हीसी विभागाचे प्राध्यापक, विविध सामाजिक संस्था व संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विविध संस्था, संघटना व मान्यवरांच्या वतीने प्रा. हरिअर गायके यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

लातूर आवृत्ती
१ जुलै, २०२६ पान क्र. ३
द्वारा समर्थित: erelego.com

# प्रा. हरिअर गायके यांचा शैक्षणिक प्रवास पुढील पिढीसाठी आदर्शवत

## सेवानिवृत्तीनिमित्त बाभळगाव येथे सत्कार, कार्याचा केला गौरव



**प्रतिनिधी** | लातूर

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयातील एमसीव्हीसी विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक हरिअर गायके यांचा सेवानिवृत्तीनिमित्त नुकताच स्नेहपूर्ण सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक आणि सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या प्रदीर्घ योगदानाबद्दल विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा गौरव करण्यात आला.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. तर लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, धाराशिवचे पशुसंवर्धन जिल्हा उपआयुक्त डॉ. दिपक मुळे आणि विधानसभा उपाध्यक्षांचे डी.एस.डी. महेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. गायके यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या समर्पित सेवाकार्याचा मान्यवरांनी गौरव केला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले काम उल्लेखनीय असून, नव्या पिढीतील शिक्षकांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. प्रा. संदीपान चेवले, चंद्रकांत पाटील आणि जी. पी. सूर्यवंशी यांनीही मनोगत व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पुरोगामी विचाराचे
एकमत



**समर्पित सेवाकार्याचा गौरव । खासदार डॉ. काळगेंसह जिल्हाधिकाऱ्यांची उपस्थिती**

# प्रा. हरिहर गायके यांना सेवानिवृत्तीनिमित्त निरोप

**बाभळगाव : वार्ताहर**



दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील एमसीव्हीसी विभागाचे ज्येष्ठ प्रा. हरिअर गायके यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांचा स्नेहपूर्ण सत्कार करण्यात येऊन निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, डॉ. दिपक मुळे, जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन, धाराशिव, महेश कुलकर्णी (डी.एस.डी., विधानसभा उपाध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अध्यक्षांसह प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून प्रा. हरिअर गायके यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या समर्पित सेवाकार्याचा गौरव केला. यावेळी प्रा. संदिपान चेवले, चंद्रकांत पाटील आणि जी. पी. सूर्यवंशीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास रेणा सहकारी साखर कारखान्याचे संचालक चंद्रकांत पाटील, श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य अनिल कुरेवाड, सेवाकर उपआयुक्त, मुंबई राजेशाहेब माने, जिल्हा उपआयुक्त (पशुसंवर्धन) डॉ. राजकुमार पाटील, बँक ऑफ बडोदा डेअरी, पुणे येथील असिस्टंट डेप्युटी मॅनेजर डॉ. विलास सुनार, महाराष्ट्र व्होकेशनल टीचर्स ऑर्गनायझेशनचे राज्याध्यक्ष भालचंद्र येडवे, भगवान नागरी सहकारी बँकेचे चेअरमन सुभाष पांचपुते, एमएसईबी, लातूरचे इलेक्ट्रिकल इंजिनिअर प्रमोद बुधवळे, उपविभागीय अभियंता विक्रम कोळवे, तसेच सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन), कळंब डॉ. हणमंत गायके व सहकार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर डॉ. रवींद्र गायके आदी उपस्थित होते. विविध संस्था, संघटना व मान्यवरांच्या वतीने प्रा. हरिअर गायके यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

प्रारंभी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव यांच्या वतीने अधीक्षक बाळासाहेब देशमुख यांच्या हस्ते प्रा. गायके व सौ. संगीता गायके यांचा यथोचित गौरव करण्यात आला. स्टाफ सचिव विवेक कदम, वसंत मस्के, डॉ.जयदेवी पवार, प्रा. शिल्पा हालसिकर, प्रा. अंकिता वाडकर यांनी गायके परिवाराचा भावपूर्ण सत्कार केला. प्रास्ताविक स्टाफ अकादमी प्रमुख डॉ. नरेंद्र देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कल्याणकर यांनी केले तर सन्मानपत्राचे वाचन व आभार प्रदर्शन डॉ. नाना जाधव यांनी केले.